*मराठी ज्युनिअर (इयत्ता ५, ६, ७)*

***विशेष सूचना :***

*१. प्रत्येकास फक्त ३ मिनिटे दिली जातील.*

*२. कृपया विषयास धरून बोलावे.*

*३. परिक्षकांद्वारा मूल्यांकन खालीलप्रमाणे:*

*(अ) मजकूर : ३० गुण (ब) स्पष्टता: १० गुण (क) प्रभाव : १० गुण*

# १. नरेंद्रनाथांचे प्रथम आगमन आणि परिचय

आपल्या चिन्हित भक्तांचा आगमनकाल समीप आला आहे हे जाणल्यावर दिव्यभावारूढ श्रीरामकृष्ण ह्या काळात त्या लोकांची किती उत्कंठतेने वाट पाहत होते हे स्वामी विवेकानंद त्यांच्याकडे प्रथम आले तेव्हाचा वृत्तान्त विचारात घेतल्यास चांगल्या प्रकारे कळू शकते. कलकत्त्याच्या सिमला नामक मोहोल्ल्यातील श्री सुरेन्द्रनाथ मित्र दक्षिणेश्वरी येऊन ठाकुरांच्या म्हणजेच श्रीरामकृष्णांच्या पुण्यदर्शनलाभाने धन्य झाले होते. प्रथम दर्शनाच्या दिवसापासूनच श्रीयुत सुरेन्द्र ठाकुरांकडे विशेष आकृष्ट झाले आणि थोड्या दिवसातच त्यांच्याशी घनिष्ठ संबंध होऊन त्यांनी त्यांना स्वत:च्या घरी घेऊन जाऊन आनंदोत्सव साजरा केला. चांगला गायक न मिळाल्यामुळे सुरेन्द्रनाथांनी त्यादिवशी आपले शेजारी श्रीयुत विश्वनाथ दत्त यांचे पुत्र श्रीमान नरेंद्रनाथ यांना ठाकुरांसमोर भजने गाण्यासाठी आपल्या घरी सादर निमंत्रण दिले होते. ठाकुर आणि त्यांचे प्रमुख लीलासहचर स्वामी विवेकानंद यांची प्रथम भेट ह्या अशा रीतीने घडून आली होती. ती हेमंताची अखेर होती– इ. स. १८८१ चा नोव्हेंबर असावा.

नरेंद्रनाथांना त्या दिवशी बघताच ठाकुर त्यांच्याकडे विशेष आकृष्ट झाले होते. त्यांनी त्या गोड गळयाच्या तरुणाची माहिती शक्य तितकी काढून घेतली. भजन संपल्यानंतर स्वत: नरेंद्राजवळ जाऊन त्याच्याशी चारदोन गोष्टी बोलून लवकरच एक दिवस दक्षिणेश्वरी येण्याचे त्याला निमंत्रण दिले.

दक्षिणेश्वर मध्ये घडलेल्या प्रथम भेटीत नरेंद्रनाथांना बघून त्या दिवशी श्रीरामकृष्णांना जे वाटले ते संभाषणाच्या ओघात त्यांनी एक दिवस थोडक्यात सांगितले होते.

श्रीरामकृष्ण म्हणाले, “पश्चिमेच्या (गंगेकडील) दरवाज्याने नरेंद्र पहिल्या दिवशी ह्या खोलीत शिरला होता. बघितले स्वत:च्या शरीराकडे लक्ष नाही, डोक्याचे केस व कपडे यांची कसलीच फिकीर नाही, बाहेरच्या कोणत्याच गोष्टीविषयी इतर सर्वसाधारणांप्रमाणे आग्रह नाही, सगळच जणु त्याचं ढिलं. आणि डोळे बघून वाटलं की त्याच्या मनाला आतल्या बाजूने कुणी जणू सर्वदा जबरदस्तीने ओढून धरलेले आहे. बघून मनात आले–विषयी लोकांचे निवासस्थान असलेल्या कलकत्त्यात एवढा मोठा सत्वगुणी अधिकारी असणेही शक्य आहे तर!”

“जमिनीवर चटई अंथरलेली होती; बसायला सांगितले. गंगाजलाचा घडा आहे त्याच्या जवळच बसला. त्याच्याबरोबर त्या दिवशी दोनचार ओळखीची मुलेही आली होती. लक्षात आले की त्यांचा स्वभाव अगदी उलट होता–साधारण विषयी व्यक्तींचा असतो तसा; भोगाकडेच दृष्टी.”

“गाणे गाण्याविषयी विचारल्यावरून कळले की बंगाली गाणी तो फक्त दोनचारच शिकला होता. तीच गायला सांगितली, त्यावर त्याने एक गाणं सुरु केलं व सोळा आणे मन:प्राण ओतून जणू ध्यानमग्न होऊन तो ते गाऊ लागला. ते ऐकून मी मग स्वत:ला सांभाळू शकलो नाही, भावाविष्ट होऊन गेलो.”

“नंतर तो निघून गेल्यावर त्याला बघण्यासाठी अंत:करण रात्रंदिवस सतत असे व्याकूळ होऊन गेले की सांगता यायचे नाही. मधे मधे अशा वेदना होत की वाटे की माझे हृदय जणु कोणी पंचा पिळल्या प्रमाणे जोराने पिळत आहे. मग स्वत:ला आणखी सांभाळू शकत नसे; धावत बगिच्याच्या उत्तरभागातील झुडुपामध्ये जिथे कोणी फारसे फिरकत नसते तिथे जाऊन ‘अरे तू ये रे, तुला बघितल्याखेरीज आता आणखी राहू

शकत नाही' असे म्हणून मोठ्याने रडत असे! लागोपाठ सहा महिने असे झाले होते. आणखी सारी मुले जी इथे आली आहेत, त्यांच्यातील कुणाकुणासाठी कधी कधी मन कसेसे झाले आहे, परंतु नरेंद्रासाठी जसे झाले होते त्याच्या तुलनेने ते काहीच नाही असे म्हटल्यास वालेल."

श्रीयुत नरेंद्रनाथ एक दिवस त्या प्रसंगासंबंधी बोलताना म्हणाले होते–

"गाणे तर गायलो; त्यानंतर लगेच ठाकुर उठून माझा हात धरून त्यांच्या खोलीच्या उत्तरेला जी पडवी आहे, तिथे मला घेऊन गेले. तेव्हां हिवाळा होता; उत्तरेकडचा वारा निवारण्यासाठी त्या पडवीच्या खांबांमधली जागा चटईच्या पडद्यांनी झाकलेली होती, म्हणून त्या पडवीत शिरून खोलीचा दरवाजा बंद करून टाकल्यास खोलीतील किंवा बाहेरील कोणीही माणूस दिसत नसे. पडवीत प्रवेश करताच ठाकुरांनी खोलीचा दरवाजा बंद केल्याने वाटले की मला बहुधा एकांतात काही उपदेश देणार आहेत. परंतु त्यांनी जे काही म्हटले व केले ते अगदीच कल्पनेपलीकडचे होते. एकाएकी माझा हात धरून ढळाढळा आनंदाश्रु ढाळू लागले आणि पूर्वपरिचिताप्रमाणे मला अतोनात स्नेहाने संबोधून म्हणू लागले– 'इतक्या दिवसांनी यायचे असते? मी तुझी कशा प्रकारे वाट पाहत आहे ह्याचा एकदा विचार करायचा नाही? विषयी लोकांच्या फालतू गोष्टी ऐकता ऐकता माझे कान पोळून जाण्याची पाळी आली आहे, मनातली गोष्टं कुणालाही सांगायला न मिळाल्याने माझी छाती फुटायला आली आहे.' असले कितीतरी बोलू लागले अन् रडू लागले. परत दुसऱ्याच क्षणी माझ्यासमोर हात जोडून उभे राहून एखाद्या देवतेप्रमाणे मला आदर दर्शवून म्हणू लागले– 'जाणतो मी प्रभो, तुम्ही तेच पुरातन ऋषि, नररुपी नारायण आहात, जीवांची दुर्गती निवारण्यासाठी तुम्ही पुन्हा देह धारण केला आहे.' इत्यादि."

"मी तर त्यांच्या अशा वागण्याने अगदी निर्वाक स्तंभित होऊन गेलो. मनातल्या मनात विचार करू लागलो– 'हे मी कुणाला बघायला

आलो आहे? हे तर सपशेल वेडे दिसतात; एरवी विश्वनाथ दत्तांचा मुलगा मी, मला उद्देशून हे सारं म्हणायचं? ते कसेही असो, चूप राहिलो; तो अद्भुत वेडा त्याच्या इच्छेनुसार बोलत गेला. दुसऱ्याच क्षणी मला तिथे राहायला सांगून ते खोलीत गेले आणि लोणी व काही संदेश आणून मला स्वत:च्या हाताने खाऊ घालू लागले. मी पुन्हा पुन्हा म्हणू लागलो– 'मला खायचं सारं द्या, मी मित्रांबरोबर वाटून खाईन' पण त्यांनी ते मुळीच ऐकले नाही. म्हणाले– 'ते खातील मग; तू खा' असे म्हणून ते सारे मला खाऊ घालून मग कुठे ते थांबले. नंतर माझा हात धरुन म्हणाले– 'म्हण, मी लवकर एक दिवस इथे तुमच्याकडे एकटा येईन.' त्यांचा असा प्रबळ आग्रह डावलू न शकल्याने नाइलाजाने 'येईन' म्हणालो आणि त्यांच्याबरोबर खोलीत येऊन मित्रांजवळ जाऊन बसलो."

"बसून त्यांना निरखू लागलो आणि आपल्याशीच विचार करू लागलो. दिसले की त्यांच्या वर्तणुकीत, बोलण्यात, इतर सगळयांशी वागण्यात, वेड्यासारखे काहीच नाही. त्यांचे ते चांगले बोलणे व भावसमाधी बघून वाटले की, खरोखरच ह्यांनी ईश्वरासाठी सर्वस्वाचा त्याग केला आहे, आणि हे जे सांगत आहेत ते त्यांनी स्वत: केलेले आहे. 'तुम्हा लोकांना जसे पाहतो आहे, तुम्हा लोकांशी जसे बोलतो आहे, तशाच प्रकारे ईश्वराला पाहता येते व त्याच्याशी बोलता येते. परंतु असे करु इच्छितो कोण? लोक बायकोपोरांच्या शोकाने तांब्या तांब्या आसवं ढाळतात, इस्टेटीसाठी किंवा पैशासाठी तसे करतात, पण ईश्वर मिळाला नाही म्हणून असे कोण करतो सांगा? तो मिळाला नाही म्हणून जर असे व्याकूळ होऊन कोणी त्याला आळवील तर तो निश्चित त्याला दर्शन देतो'– त्यांच्या तोंडी ह्या साऱ्या गोष्टी ऐकून वाटले की हे इतर सगळया धर्मप्रचारकांप्रमाणे कल्पनेच्या किंवा अलंकारिक भाषेच्या मदतीने असे बोलत नाहीत, खरोखरच सर्वस्वाचा त्याग करून आणि संपूर्ण मनाने ईश्वराला आळवून जे ह्यांनी प्रत्यक्ष पाहिले आहे तेच हे सांगत आहेत."

(संदर्भ : श्री रामकृष्णलीलाप्रसंग)

*मराठी ज्युनिअर (इयत्ता ५, ६, ७)*

***विशेष सूचना :***

*१. प्रत्येकास फक्त ३ मिनिटे दिली जातील.*

*२. कृपया विषयास धरून बोलावे.*

*३. परिक्षकांद्वारा मूल्यांकन खालीलप्रमाणे:*

*(अ) मजकूर : ३० गुण (ब) स्पष्टता: १० गुण (क) प्रभाव : १० गुण*

# २. परिव्राजक स्वामी विवेकानंद

स्वामीजींनी भारतभर प्रवास केला. या प्रवासात त्यांच्यावर निरनिराळे प्रसंग आले. निरनिराळ्या माणसांशी त्यांचा संबंध आला, हिमालयातील बर्फाच्छादित वैराण भागांपासून दक्षिण टोकाच्या कन्याकुमारीपर्यंत ते फिरले. या त्यांच्या भटकंतीबद्दल सांगत असताना त्यांनी खेत्री येथील एक घटना सांगितली-

माझ्या या भ्रमंतीमधे एकदा मी कुठेतरी होतो. लोकांच्या झुंडीच्या झुंडी माझ्याकडे येत होत्या. त्यांना काहीतरी उपदेश द्यावा असे त्यांचे म्हणणे होते. तुमचा विश्वास बसणार नाही पण खरेच एकदा सतत तीन दिवस व तीन रात्र या लोकांनी मला बोलायला भाग पाडलं. मला एका क्षणाचीही उसंत मिळू दिली नाही. मी काही खाल्लं की नाही याचीही विचारपूस या लोकांनी केली नाही. तिसऱ्या दिवशी रात्री सर्वजण निघून गेल्यानंतर एक अस्पृश्य जातीचा वृद्ध माणूस माझ्याजवळ आला आणि म्हणाला, “स्वामीजी, गेल्या तीन दिवसांपासून मी पाहत आहे, आपण अन्नाचा एक घासही घेतला नाही. आपण खूप थकलेले आहात. आपल्याला भूकही कडकडून लागली असणार. खरच, तुम्ही प्यालाभर पाणी देखील प्यायला नाहीत.” मला वाटले, खरोखर ईश्वरच ह्या अंत्यजाच्या रुपाने माझी परीक्षा घेण्यासाठी माझ्याकडे आला की काय? मी त्याला म्हटले, “काही खायला मिळेल का?” तो म्हणाला, “स्वामीजी, मला मनापासून वाटतं की तुम्हाला काहीतरी खायला द्यावं. पण माझ्या हातच्या चपात्या

तुम्हाला कशा चालतील? तुमची हरकत नसेल तर मी आटा, डाळ, इ. आणून देतो. तुम्ही चपात्या करून घ्या.” त्यावेळी संन्यास धर्माप्रमाणे मी विस्तव वगैरे पेटवू शकत नव्हतो. मी त्याला म्हणालो, “तुम्हीच मला चपात्या भाजून द्या. मी त्या आनंदाने खाईन.” हे ऐकताच तो माणूस भीतीने गर्भगळित झाला. तो खेत्रीच्या महाराजांचा प्रजाजन होता. महाराजांना जर कळले की या चांभाराने संन्याशाला आपल्या हातच्या पोळया दिल्या, तर त्याला भयंकर शिक्षा झाली असती. कदाचित त्याला राज्याबाहेर घालवून दिले असते. तथापि मी त्याला म्हणालो, “घाबरू नका महाराज तुम्हाला शिक्षा करणार नाहीत.” त्याला माझा विश्वास वाटेना. परंतु हृदयाच्या कोमलतेमुळे त्याला राहवले नाही. याचे परिणाम गंभीर होतील हे माहीत असूनही त्याने माझ्यासाठी स्वत: केलेल्या चपात्या आणल्या. त्यावेळी मला वाटले, ‘प्रत्यक्ष इंद्राने जरी मला अमृताचा पेला सोन्याच्या ताटात ठेवून दिला तरी तेही या चपात्यांपुढे फिके ठरेल.’ माझ्या डोळयांतून कृतज्ञतेचे अश्रू ओघळू लागले. मला वाटले आपल्या भारतात असे हजारो उदार मनाचे लोक झोपडयांतून राहतात. आपण त्यांना हलक्या जातीचे आणि अस्पृश्य लेखतो. महाराजांशी माझी चांगली ओळख झाल्यावर त्यांना मी या माणसाच्या उदारपणाची गोष्ट सांगितली. त्यानंतर मग काही दिवसांनी या माणसाला दरबारचे बोलावणे आले. म्हातारा फार घाबरून गेला होता. आपल्याला आता फार मोठी शिक्षा होणार असे त्याला वाटू लागले. परंतु महाराजांनी त्याची प्रशंसा केली आणि त्याचे दारिद्र्य कायमचे मिटवले.

एकदा स्वामीजींच्या मनात आले की, त्यांनी आपले घरदार सोडले ते असे दारोदार भिक्षा मागण्यासाठी नाही. याच काळात त्यांनी निराशेने आपल्या एका गुरुबंधूंना पत्रात लिहिले मी एखाद्या कावळयाप्रमाणे दुसऱ्यांच्या घरी जाऊन निलाजरेपणे ‘भिक्षांदेही’ करतो. अशाच एका प्रसंगी त्यांच्या मनात विचार आला की अशी भिक्षांदेही आपण सोडून द्यावी. मला जेवू घालण्यात बिचाऱ्या गरीब माणसाचा काय लाभ? मूठभर तांदूळ जर त्यांना वाचवता आले तर त्यांच्याच मुलाबाळांची पोटे भरतील. मी जर ईश्वराचा साक्षात्कार

करून घेतला नाही तर या देहाचा काय उपयोग? अशा रीतीने एक विलक्षण मरगळ व आध्यात्मिक औदासिन्य त्यांना जाणवू लागले. महान पुरुषांच्या मनात असे विचार कधी कधी येतातच. अशा एका निराशेच्या वेळी त्यांनी अरण्यात प्रवेश करून एखाद्या प्राचीन ऋषिमुनिप्रमाणे अन्नत्यागाने क्षीण झालेला देह टाकून देण्याचे ठरवले. विशेष काही विचार न करता ते एका गहन अरण्यात शिरले. अरण्य मैलोगणती पसरले होते आणि स्वामीजी त्या रानातून दिवसभर पुढे जात होते. जेवण्याखाण्याचा पत्ता नाही. संध्याकाळ झाली. अतिश्रमाने थकून ते एका झाडाखाली टेकले. श्रमाने त्यांना ग्लानी आली होती. ते दूरवर कुठेतरी अमनस्थपणे पाहत होते. त्यांचे मन ईश्वराच्या रुपाशी तल्लीन झाले होते.

काही वेळाने एक वाघ समोरून येताना त्यांना दिसला. तो हळूहळू जवळ येत होता. त्यांच्यापासून थोड्या अंतरावर तो बसून राहिला. स्वामीजींच्या मनात विचार आला, ‘छान. ठीक झाले. आम्ही दोघेही भुकेले आहोत. हे शरीर कैवल्यज्ञान मिळवू शकले नाही. त्याअर्थी ह्या देहाकडून जगाचे काही भले होईल असे वाटत नाही, ह्या भुकेलेल्या प्राण्याची भूक शमविण्याच्या कामी तरी ह्या देहाचा उपयोग व्हावा.’ स्वामीजी तेथे आरामात शांतपणे हालचाल न करता पहुडले होते. कोणत्याही क्षणी हा वाघ आपल्यावर उडी घेणार अशा विचाराने वाट पाहू लागले. परंतु का कुणास ठाऊक, वाघाने तेथून काढता पाय घेतला. तो पुन्हा परत येईल या आशेने स्वामीजी वाट पाहत बसले. परंतु तो आला नाही. ती रात्र त्यांनी त्या घोर अरण्यात आत्मचिंतनात काढली. सकाळ झाली. त्यांच्या शरीरात जणू शक्ती-संचार झाला.

आणखी एका प्रसंगी ते असेच थकून गेले होते. त्यांच्याने एक पाऊलही पुढे टाकवत नव्हते. सूर्य वरून आग ओकत होता. कसेतरी एका जवळच्या झाडाखाली त्यांनी स्वतःला ओढत आणले आणि तेथेच त्यांनी बैठक मारली. त्यांना त्यांच्या अंग प्रत्यंगातून भयानक थकवा जाणवत होता. त्यानंतर अंधारात लख्ख प्रकाश पडावा तसा त्यांच्या मनात विचार आला, “सारी शक्ती आत्म्याच्या ठायी असते हे खरे नाही काय? त्या

शक्तीवर देहेन्द्रियांचा प्रभाव कसा पडू शकेल? मी शक्तीहीन कसा असेन?" त्या विचाराबरोबर त्यांच्या सर्वांगातून उर्जा प्रवाह वाहू लागला. त्यांच्या मनामध्ये लख्ख प्रकाश पडला. सर्वांगात चैतन्य स्फुरले. ते उठले आणि चालू लागले. पुन्हा कधी दुर्बळ विचारांच्या आहारी न जाण्याचा त्यांनी निश्चय केला. आपल्या परिव्राजक काळात त्यांची अनेकदा अशी अवस्था झाली होती. परंतु त्यांनी आपल्यातील उत्तम शक्तींना जागे केले आणि त्यांच्या सर्वांगात शक्तीस्त्रोत सळसळू लागला.

एकदा हिमालयात फिरत असताना त्यांना एक वृद्ध साधू थंडीने कुडकुडताना दिसला. सिंहाप्रमाणे सर्वत्र अप्रतिबद्ध संचार करणाऱ्यांपैकी हा एक साधू होता. कोणत्याही प्रकारचे संरक्षण हे साधू कस्पटासमान मानतात. परंतु हा साधू आजारी होता आणि थंडी कडाक्याची होती. स्वामीजी तेथून जात होते आणि त्यांना त्याची ती अवस्था दिसली. त्यांनी तात्काळ त्यांच्याजवळ असलेले एकमेव कांबळे त्या साधूच्या अंगावर टाकले. त्या साधूने मान वर करून त्यांच्याकडे पाहिले. त्याचे डोळे कृतज्ञतेने भरून आले. चेहऱ्यावर स्मितहास्य उमटले आणि तो म्हणाला, "देव तुझे भले करो."

स्वामीजी एकांतवासात असताना त्यांना अनेक कठिण प्रसंगांना तोंड द्यावे लागले, संकटांचा सामना करावा लागला. श्रीरामकृष्णांचे चित्र आणि गीता याशिवाय त्यांच्याजवळ काहीच नसायचे. अनेकदा त्यांना खडतर प्रसंगांना सामोरे जावे लागले. त्यांना कुणी खायला देईना, आसरा देईना. त्यांना त्या दिवसात एकदा एका दलित कुटुंबात राहावे लागले. त्यातून त्यांना आढळून आले की समाजाने ज्यांना दूर ठेवले अशा लोकांमधेही कितीतरी उच्च दर्जाचे गुण असू शकतात. त्यांचा विकास होऊ शकतो. अशा अनुभवांतूनच त्यांना भारतातील दुर्दशा दिसून आली आणि यातूनच ते अशा लाखो दलितांचे पाठीराखे बनले. सर्व बाजूंनी त्यांना दारिद्र्य आणि दु:ख दिसले आणि त्यांचे अंत:करण कळवळून उठले.

ही भ्रमंती स्वामीजींना बरेच काही शिकवून गेली.

*मराठी ज्युनिअर (इयत्ता ५, ६, ७)*

***विशेष सूचना :***

*१. प्रत्येकास फक्त ३ मिनिटे दिली जातील.*

*२. कृपया विषयास धरून बोलावे.*

*३. परिक्षकांद्वारा मूल्यांकन खालीलप्रमाणे:*

*(अ) मजकूर : ३० गुण (ब) स्पष्टता: १० गुण (क) प्रभाव : १० गुण*

# ३. शिवभावे जीव सेवा

पश्चिमेतील कठोर परिश्रमानंतर स्वामीजी हिमालयातल्या दार्जिलिंग या पर्वतराजीतील रम्य ठिकाणी अमळ विश्रांती घेत होते. तेव्हा अस काही घडल की त्यांना पुन्हा एकदा कामाला लागाव लागल.

त्यावेळी कलकत्त्यात एका भयानक रोगाची साथ पसरली होती. अनेक लोक त्यात मृत्युमुखी पडत होते. तो भयानक रोग आपल्याला लागेल या भीतीन कोणीही आजारी माणसांची सेवा करायला तयार नव्हते. त्या रोगाला ‘प्लेग’ अस म्हणत.

स्वामीजींनी आपल्या संन्यासी बंधू आणि शिष्यांना एकत्र बोलावले.

“आपण जाऊ आणि या आजारी लोकांची सेवा करु. आपण इस्पितळे उघडू आणि ज्यांना हा भयानक रोग झाला आहे त्यांची आपण सेवा करू.”

“पण स्वामीजी, हे अस काम करायला आपल्याजवळ पैसा कुठे आहे?” कुणीतरी विचारलं.

स्वामीजी तापलेल्या निखाऱ्यासारखे पेटले.

“पैसा?” ते गरजले, “तुम्ही पैशाची काळजी करू नका. ह्या सेवाकार्यास लागून जा. जर गरज पडली तर नवीन मठ विकेन आणि सारा पैसा त्या कामाला देईन!” स्वामीजी पुढे म्हणाले, “तुम्हाला आठवत नाही का?

श्रीरामकृष्ण सांगायचे की आपण माणसामधल्या ईश्वराची सेवा केली पाहिजे ही माणसातल्या देवाची सेवाच तर आहे. ती करायला हवी." पण त्यांना मठ विकायची गरज पडली नाही. पैसा उभा राहिला आणि कामही झाले. शेवटी एकदा प्लेगची साथ संपली आणि लोक पुन्हा बरे झाले.

स्वामी विवेकानंदांना पददलितांचा आणि गरिबांचा कळवळा होता. सन १९०१ च्या उत्तरार्धात, मठाची जमीन समतल करावयाचे काम हाती घेतले होते. या कामासाठी बऱ्याच संथाल मजुरांची योजना करण्यात आली होती. हा मजूर वर्ग अत्यंत गरीब होता आणि समाजात त्याला कोणतेही स्थान नव्हते. त्यांच्याशी बोलणे व त्यांची दु:खे जाणून घेणे यात स्वामीजी रमत असत. त्यांना त्यांच्याबद्दल करुणा वाटत असे. एकदा त्यांनी त्यांच्यासाठी जेवणाचा मोठा बेत केला, त्यांनी कधीच चाखले नसतील असे पक्वान्न स्वामीजींनी त्यांच्या पात्रात वाढले. जेवण झाल्यावर स्वामीजी म्हणाले, "तुम्ही नारायण आहात. तुमच्या वेषात मो नारायणालाच जेवायला दिले."

एका शिष्याला ते म्हणाले, "मला खरोखर त्यांच्यात ईश्वराचे दर्शन घडले. किती निरागस आहेत हे लोक." बेलूर मठातील आपल्या मंडळींना ते नंतर म्हणाले, "हे गरीब व अशिक्षित लोक मनाचे किती सरळ आहेत. त्यांची दु:खे तुम्ही थोडी तरी कमी करु शकाल का? तसे जर करता आले नाही तर आपल्या संन्यासाचा, त्या गेरव्या कपडयांचा काय उपयोग? दुसऱ्यासाठी आपले सर्वस्व अर्पण करणे हाच खरा संन्यास आहे. मठ आणि इमारती उभारण्याचा काय उपयोग? हे सारे विकून टाकून आलेला पैसा या दरिद्रनारायणांमध्ये वाटून टाकावा. आम्हाला घराचे काय? आम्ही तर तरुतळी निवास करणारे! अरेरे, ह्या आमच्या देशबांधवांना खायला नसताना, कपडेलत्ते नसताना आम्ही घास कसा बरं घ्यावा? माते, यांची यातून सुटका नाही का? तुम्हाला माहीतच आहे की, पाश्चात्य देशात जाऊन धर्मप्रचार करण्याच्या माझ्या उद्योगाचे एक प्रयोजन हेही होते की, माझ्या देशातील लोकांसाठी त्यांच्या योगक्षेमाची तरतूद करता यावी. कधी कधी मला वाटते की सोडून द्यावा आपल्या विद्वत्तेचा अहंकार, आपली सारी

व्यक्तिगत मुक्तीची लालसा भिरकावून द्यावी आणि गरीबांची सेवा करीत खेडोपाडी पालथी घालावीत. आपल्या चारित्र्याच्या आणि आध्यात्मिकतेच्या बळाने आणि आपल्या वैराग्यपूर्ण राहणीने येथील श्रीमंत वर्गाला लोकांप्रती असलेल्या त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून द्यावी. निधी उभारावा, साधने जमवावीत आणि दलितांची व दु:खितांची सेवा करावी. अरेरे! आपल्या देशातील कोणीही ह्या दीन, दु:खी, दुबळयांचा विचार करीत नाहीत. खरेतर हेच लोक देशाचा आधार आहेत. त्यांच्या श्रमामुळे अन्न निर्माण होते. त्यांनी एक दिवस जर आपले साफसफाईचे काम केले नाही तर शहरात जिकडे तिकडे हाहा:कार उठतो. अशा ह्या लोकांबद्दल, त्यांच्या सुखदु:खांबद्दल आस्था बाळगणारा एक तरी माणूस तुम्हाला आढळतो काय?"

एकदा एक गृहस्थ भक्ताला ते म्हणाले, "इतकी सारी तपस्या आणि वैकल्ये केल्यानंतर मला जी सर्वोच्च जाणीव झाली ती हीच, संपूर्ण सृष्टीत तोच ओतप्रोत भरुन आहे. त्याचीच ही सारी दृश्य रुपे आहेत. ईश्वर अन्यत्र कुठे शोधायला नको. सर्व प्राणीमात्रांची जो सेवा करतो तो ईश्वराचीच सेवा करतो."

रामेश्वर मंदिरात स्वामीजी ईश्वरपूजेसंबंधी बोलताना म्हणाले, "सगळयाच्या सगळया उपासनांचा सारांश आहे-शुद्धचित्ताचे बनणे आणि इतरांचे कल्याण करणे. गरीब, दुबळे, रोगी वगैरेंमध्ये ज्यांना शिव दिसतो तेच खरेखुरे शिवाचे उपासक होत. तेच खरोखर शिवाची उपासना करीत असतात. आणि जो माणूस केवळ प्रतिमेमध्येच शिवाची उपासना करीत असतो, त्याने धर्मजीवनाला नुकतीच सुरुवात केली आहे असे म्हणता येईल. फक्त मंदिरामधेच शिव आहे असे मानणाऱ्या व्यक्तीपेक्षा, जी व्यक्ती जात किंवा धर्म विचारात न घेता एकादेखील गरीब माणसाची शिवबोधाने सेवा करते, तिच्यावर शिव अधिक प्रसन्न होतात."

"कुण्या एका श्रीमंताचा एक बगीचा होता. त्या बगीच्यात दोन माळी काम करीत. त्यातील एकजण पराकाष्ठेचा आळशी होता, तो मुळीच काम करीत नसे. परंतु मालक बगीच्यात आला रे आला की तो हात जोडून, 'धनी,

काय तुमचे रूप, किती तुमचे गुण' असे म्हणत त्याच्यासमोर अक्षरश: नाचू लागे. त्या दुसऱ्या माळयाला जास्त बोलणे माहीत नव्हते. तो खूप खपून आपल्या मालकाच्या त्या बगीच्यात नाना प्रकारची फळे आणि तऱ्हेतऱ्हेच्या भाज्या वगैरेंची उत्पादन घेई, आणि तो माल डोक्यावरून वाहून बऱ्याच दूर असलेल्या आपल्या मालकाच्या घरी पोहोचता करी. आता सांगा बघू, ह्या दोघा माळयांपैकी मालकाचे जास्त प्रेम कुणावर राहील? याचप्रमाणे शिव आपल्या सगळयांचा मालक आहे, हे जग त्याचा बगीचा आहे, आणि ह्या बगीच्यात दोन प्रकारचे माळी आहेत. एका प्रकारचे माळी आळशी आणि कपटी आहेत, ते काहीही न करता केवळ शिवाच्या रूपाचे स्तोत्र गातात-शिवाचे नाक किती सुंदर आहे, डोळे किती सुरेख आहेत ह्याचे वर्णन करीत असतात. आणखी एका प्रकारचे लोक आहेत, ते शिवाच्या दीन, दरिद्री, दुबळया मुलांच्या, शिवाने उत्पन्न केलेल्या सर्व प्राण्यांच्या कल्याणाचा प्रयत्न करीत असतात. ह्या दोन प्रकारच्या स्वभावांच्या लोकांपैकी शिवाला जास्त कोण आवडतील? कोणावर शिवाचे अधिक प्रेम राहील? अलबत, जे शिवाच्या संतानांची सेवा करतात त्यांच्यावरच. जे पित्याची सेवा करू इच्छितात त्यांनी आधी त्याच्या लेकरांची सेवा करायला हवी. आधी जगातील जीवांची सेवा करायला हवी. शास्त्रात म्हटले आहे की, जे भगवंताच्या दासांची सेवा करतात तेच भगवंताचे सर्वश्रेष्ठ दास होत. म्हणून हे आपण सर्वदा लक्षात ठेवावयास हवे."

"मी तुम्हाला फिरून सांगतो की तुम्ही शुद्ध चित्ताचे व्हावयास हवे आणि जो कुणी तुमच्याकडे येईल त्याची यथाशक्ती सेवा करावयास हवी. अशा भावाने दुसऱ्यांची सेवा करणे हे शुभ कर्म होय. अशा सत्कर्माच्या शक्तीने चित्त शुद्ध होते आणि सगळयांच्या अंतर्यामी जो शिव वसत आहे तो त्या शुद्ध चित्तात प्रकट होतो. तो शिव सगळयांच्या हृदयात विराजमान आहे. जर आरशावर धूळ, माती बसलेली असेल तर त्यांत आपल्याला आपले रूप दिसत नाही. आमच्या हृदयरूपी आरशावर देखील असला अज्ञानाचा आणि पापाचा मळ साचलेला आहे. सगळयापेक्षा मोठे पाप म्हणजे स्वार्थीपणा हे होय. स्वार्थीपणा म्हणजे आधी स्वत:चीच फिकीर करणे-आधी आपलाच

विचार करणे. ‘मी आधी खाईन, मी सगळ्यांपेक्षा जास्त श्रीमंत होईन, मीच सगळ्या धनाचा मालक होईन’ असे ज्याला वाटते; ‘मी इतरांच्या आधी स्वर्गाला जाईन, मी इतरांच्या आधी मुक्ती मिळवीन’ असे ज्याला वाटते तो स्वार्थी होय. नि:स्वार्थ माणूस म्हणत असतो की ‘मी सर्वांच्या आधी जाऊ इच्छित नाही, मी सगळ्यांच्या शेवटी जाईन. मी स्वर्गात जाऊ इच्छीत नाही–जर माझ्या बांधवांना हात देण्यासाठी नरकात जावे लागले तर त्यालाही माझी तयारी आहे.’

कुणी धार्मिक आहे की अधार्मिक आहे याची पारख करावयाची असल्यास बघावे की ती व्यक्ती कितपत नि:स्वार्थ आहे. जो अधिक नि:स्वार्थ तोच अधिक धार्मिक होय, तोच शिवाच्या अधिक जवळ असतो. तो विद्वान असो की अडाणी असो, तो शिवासंबंधी काही जाणत असो की नसो, तोच इतरांपेक्षा शिवाच्या जास्त जवळ असतो. आणि जर कुणी स्वार्थी असेल तर तो जरी जगातील सारी मंदिरे पुजून आला, सगळ्या तीर्थांमधे बुचकळून आला, रोज साऱ्या अंगभर वाघासारखे भस्माचे पट्टे ओढीत असला अन् चित्त्यासारखे टिळे ठिपके काढीत असला तरी तो शिवापासून खूप खूप दूर आहे असे समजावे.”

*मराठी सिनिअर (इयत्ता ८, ९, १०)*

***विशेष सूचना :***

*१. प्रत्येकास फक्त ३ मिनिटे दिली जातील.*

*२. कृपया विषयास धरून बोलावे.*

*३. परिक्षकांद्वारा मूल्यांकन खालीलप्रमाणे:*

*(अ) मजकूर : ३० गुण (ब) स्पष्टता: १० गुण (क) प्रभाव : १० गुण*

# १. जगातील थोर आचार्य

हिंदूंच्या मतानुसार आपले हे जग सतत लाटांसारख्या गतीने चालले आहे. ते एकदा वर उठते, उन्नतीचा कळस गाठते आणि नंतर खाली येऊन काही काळ त्याच अवनतीच्या गर्तेत पडून राहते. जणू पुनरुत्थानासाठी शक्तिसंचय करीत असते. सागरावरील उत्तुंग लाटांप्रमाणे निरंतर उत्थान आणि पतन, पतन आणि उत्थान अशा गतीने हा जगत्प्रवाह सारखा चालला आहे. समस्त ब्रह्मांडाला अथवा समष्टीला जो नियम लागू आहे तोच त्यांतील प्रत्येक पिंडाला अथवा व्यष्टीलाही लागू आहे. मनुष्यसमाजाचे सर्व व्यवहार ह्याचप्रमाणे लाटांच्या गतीने चालले असतात. राष्ट्राराष्ट्रांचे इतिहासही या सत्याची साक्ष देत आहेत. भिन्न भिन्न राष्ट्र उठतात आणि पडतात. उत्थानानंतर पतन आणि पतनानंतर फिरून पूर्वीपेक्षा अधिक जोमाने पुनरुत्थान, हीच त्या सर्वांची कहाणी आहे. ही तरंगगती, हा चक्रनेमिक्रम सर्वत्र आणि सर्वदा चालू आहे. धर्मजगतातही ही असीच गती दृगोच्चर होते. प्रत्येक जातीच्या आध्यात्मिक जीवनात उत्थान पतनांची युगे येत असतात. जेव्हा एखाद्या जातीचा पतनकाळ येतो तेव्हा असे वाटू लागते की तिची सारी जीवनशक्ती अजिबात नष्ट होऊन गेली आहे. उभी जात नेस्तनाबूद झाली आहे. परंतु त्या अवस्थेत ती हळूहळू शक्तीचा संचय करीत असते आणि नवबलसंपन्न होऊन फिरून प्रबल वेगाने वर उठत असते. तिच्या जीवनप्रवाहात

फिरून एक प्रचंड लाट उफाळत असते. कधी कधी तर या उत्थानाला महापुराचे स्वरूप प्राप्त होत असते. आणि असे नेहमीच आढळून येते की, उंच उसळलेल्या त्या प्रत्येक लाटेच्या शिरोभागी एखादा महापुरुष सभोवार आपल्या तेजाची मंगल प्रभा पसरवीत विराजमान आहे. हे असले महापुरुषच अखिल जगाला ललामभूत झालेले थोर तत्वचिंतक होत. हेच जगातील सर्वश्रेष्ठ आचार्य-मंत्रद्रष्टे ऋषी होत, हेच जीवनदायी श्रेष्ठ भावांचे दिव्य वाहक ईश्वराचे अवतार होत.

काही लोकांची अशी धारणा असते की, जगात धर्म फक्त एकच असणे शक्य आहे. त्यांच्या मते धर्माचार्य किंवा ईश्वरावतारही एकच एक असू शकतो. पण ही त्यांची धारणा समूळ चुकीची आहे. सर्व महापुरुषांच्या जीवनाचे अनुशीलन केल्यास असे दिसून येते की, विधात्याने त्यातील प्रत्येकाला जणु या विश्व रंगभूमीवर केवळ एकेकच प्रवेशाचा अभिनय करण्यासाठी पाठविले होते. आणि आपण पाहतोच की, सर्व सुरांच्या समन्वयानेच एकतानता वा संवादित्व निर्माण होत असते. केवळ एकाच सुराने नव्हे. भिन्न भिन्न जातींच्या जीवन इतिहासाचे अवलोकन केल्यासही दिसून येते की, कोणतीही एखादी विशिष्ट जात कधी एकटीच साऱ्या जगातील समस्त उपभोगांची अधिकारी होऊ शकली नाही. कोणतीही जात असे म्हणण्याचे धाडस करु शकणार नाही की, समस्त जगावर, समस्त भोगांवर तिचाच एकटीचा जन्मसिद्ध हक्क आहे. विधात्याने कल्पिलेली ही जातीजातींची एकतानता वा संवादित्व साधण्यासाठी प्रत्येक जातीला स्वत:चा सूर आळवावा लागत असतो. प्रत्येक जातीला एका विशिष्ट व्रताचे पालन करावे लागत असते. एक विशिष्ट कर्तव्य पार पाडावे लागत असते. या सर्वांच्या सम्मिलनाने महासमन्वय साधला जात असतो. महान संवादित्व निर्माण होत असते.

आपल्यातील बहुतांश लोकांचा व्यक्तिनिष्ठ धर्मावर, विशिष्ट व्यक्तीचे ज्यात आदर्शभूत मानली जाते अशा धर्मावर जन्मत:च विश्वास असतो. आपण सूक्ष्म, अमूर्त तत्वासंबंधी, नाना मतांसंबंधी हवे तितके

बोलत असलो तरीसुद्धा आपला प्रत्येक विचार आणि आपले प्रत्येक कार्य हे जणू दर्शवीत असतात की एखाद्या विशिष्ट व्यक्तीच्या जीवनात मूर्त स्वरूपास आले असेल तरच आपण कोणत्याही सूक्ष्म तत्वाची धारणा करु शकत असतो, एरवी नाही. आपल्या स्थूल दृष्टीला गोचर असा आदर्श पुरुषाच्या ठायी प्रकट झाला असेल तरच आपण कोणत्याही भावाची वा तत्वाची धारणा करण्यास समर्थ असतो, एरवी नाही. आपण केवळ प्रत्यक्ष उदाहरणाच्या साहाय्यानेच कोणत्याही उपदेशाचे आकलन करु शकत असतो. सूक्ष्म तत्वाच्या धारणेसाठी प्रत्यक्ष उदाहरणाची अथवा आदर्श व्यक्तीची जरुर न भासण्याइतके आपण सर्वचजण जर ईश्वरकृपेने उन्नत असतो तर केव्हाही सोन्याहून पिवळेच झाले असते, यात संशय नाही. परंतु दुर्दैवाने वस्तुस्थिती मात्र तशी नाही याला काय उपाय? म्हणूनच अधिकांश माणसे स्वभावत:च या असाधारण पुरुषांच्या चरणी आत्मसमर्पण करीत आली आहेत.

ईश्वर सर्वव्यापी, निर्गुण, निराकार अशा तत्त्वांच्या स्वरूपाचा असला तरीही सध्या आपल्या मनाची घडणच अशी आहे की केवळ नररूपधारी अवतारांमध्येच आपल्याला त्याची उपलब्धी, त्याचा साक्षात्कार होऊ शकेल. जेव्हा हे महान प्रदीप उजळले जातात तेव्हां त्यांच्या प्रकाशातच मानव ईश्वराला पाहू शकतो. त्याचा साक्षात्कार करून घेऊ शकतो.

मानवजातीच्या इतिहासाचे परिशीलन केल्यास तुम्हास दिसून येईल की, विश्वाच्या कल्याणाप्रित्यर्थ वेळोवेळी हे अवतार पृथ्वीतलावर आले आहेत, आणि त्यांच्या जन्मापासून जणू त्यांचे जीवनाचे उद्दिष्ट सुनिश्चित झालेले आहे. त्यांचे जीवनव्रत जणू सुस्पष्टपणे ठरून गेलेले आहे. जीवनात आपल्याला काय करावे लागणार आहे हे जणू काही त्यांनी जन्मापासून जाणले असते, पक्के ठरविलेले असते. स्वत:च्या भावी जीवनकार्याचा संपूर्ण आराखडा जणू त्यांच्या दृष्टीसमोर आखलेला असतो, आणि तुम्हाला आढळून येईल की, त्या आपल्या नियोजित योजनेपासून ते कधी चुकूनही बोटभरदेखील ढळत नाहीत. याचे कारण हेच आहे की, काही ठरलेले

कार्य करण्यासाठीच ते येत असतात, जगाला एक संदेश देण्यासाठी ते येत असतात, आणि आपले अवतारकृत्य संपवून निजधामी परत जात असतात.

या सर्वच्या सर्व महान आचार्यांच्या ठायी तुम्हाला हे एक व्यवच्छेदक वा सर्वसामान्य लक्षण आढळून येईल की, त्यांच्यात स्वत:विषयी अगाध विश्वास वसत असतो.

माझ्या स्वत:च्या जीवनात ह्या सर्वच अवतारांची पूजा करणे मला शक्य झाले आहे, आणि भविष्यकाळी जे सर्व अवतार होणार आहेत त्यांचीही पूजा करण्यासाठी मी सिद्ध आहे.

यथार्थ सत्याचा आणि ईश्वराचा आविर्भाव तुमच्यापैकी ज्यांना फक्त कोणा एका विशिष्ट अवताराच्या ठायी आढळू शकतो आणि दुसऱ्या कोणत्याही अवताराच्या ठायी आढळू शकत नाही, त्याच्यासंबंधी मी असा निश्चित सिद्धांत बनविलेला आहे की, त्यांना कोणत्याच अवताराचे ईश्वरत्व खरोखरच समजलेले नाही. ह्या लोकांनी केवळ काही शब्द आत्मसात केलेले असतात, या पलीकडे काहीही नाही. लोक ज्याप्रमाणे एखाद्या राजकीय गटात शिरून त्या गटाचे मत दत्तक घेतात आणि तेच आपले मत म्हणून जाहीर करीत असतात, त्याचप्रमाणे हे लोकही एखाद्या विशिष्ट धर्मसंप्रदायात भरती होऊन त्या संप्रदायाची ठरीव मते आपलीच म्हणून सतत पोपटपंची करीत असतात. पण याला वस्तुत: धर्म असे कधीतरी म्हणता येईल काय? कधीच नाही.

मला स्वत:च्या जीवनात आलेल्या अनुभवांवरून मी हाच धडा शिकलो आहे की, लोक जे सारे भयंकर दोष धर्माच्या माथी मारू पाहतात त्या दोषांसाठी खरोखर धर्म जबाबदार नाही. धर्माने कधीच लोकांवर अत्याचार केले नाहीत. धर्माने कधीच चेटकिणी म्हणून स्त्रियांना जिवंत जाळले नाही, धर्माने कधीच असल्या दुष्कृत्यांना हातभार लावला नाही. मग लोकांना ही सारी कृष्णकृत्ये करण्यासाठी कुणी बरे चेतविले? कुटिल

राजकारणाने, धर्माने नव्हे. आणि हे असले ओंगळ राजकारण जर धर्माच्या नावाखाली वावरू लागेल तर तो दोष कुणाचा बरे?

म्हणून, जर एखादी व्यक्ती उभी राहून म्हणू लागेल की, 'माझाच धर्म सत्य आहे, माझा अवतारच एकमेव सत्य अवतार आहे', तर तिचे म्हणणे साफ खोटे आहे, तिला धर्माचा ओ का ठो देखील माहीत नाही असे खुशाल समजा. धर्म म्हणजे ठराविक सिद्धांताची पोपटपंची नव्हे, मतमतान्तरांचा काथ्याकूट नव्हे किंवा दुसऱ्यांच्या सिद्धांतांना केवळ बुद्धीच्या साहाय्याने होकार देणे पण नव्हे. धर्म म्हणजे प्राणोप्राण सत्याची उपलब्धी होणे. धर्म म्हणजे ईश्वराच्या चरणांना प्रत्यक्ष स्पर्श करणे, धर्म म्हणजे अशी उपलब्धी होणे, असे प्रत्ययास येणे की, 'मी आत्मस्वरूप असून त्या अनंत परमात्म्याशी आणि त्याच्या सर्वच अवतारांशी माझा एक अखंड संबंध आहे.'

सर्वच देशांतील आणि सर्वच युगांतील धर्मानुभवसंपन्न महान नरनारींना ओळखण्यास शिका, आणि हेही समजून घ्या की वस्तुतः त्यांच्यात आपसात काही वेगळेपणा नाही. जिथे जिथे म्हणून खऱ्याखऱ्या धर्माचा विकास झाला आहे, जिथे जिथे ब्रह्म-संस्पर्श, ईश्वराचा साक्षात्कार घडला आहे, जिथे जिथे म्हणून आत्म्याला परमात्म्याची प्रत्यक्ष प्रतीती झाली आहे, तिथे तिथे तुम्हाला आढळून येईल की त्या व्यक्तीचे मन इतके विशाल होऊन गेले आहे की सर्वत्र त्या ईश्वराची ज्योती बघण्यास ती समर्थ झाली आहे.

सर्व महापुरुष आणि हे सर्व अवतार महान आहेत. खरे आहेत, का की, त्यांच्यातील प्रत्येकजण एकेका महान आदर्शाचा प्रचार करण्यासाठी आला होता. दृष्टान्तादाखल भारतीय अवतारच घ्या. धर्मसंस्थापकांमध्ये तेच सर्वांत प्राचीन होत. प्रथम श्रीकृष्णांकडेच वळू या. तुमच्यापैकी ज्यांनी गीता वाचली असेल त्यांना माहीत असेल की त्या संपूर्ण ग्रंथाचा सार-सिद्धान्त आहे - अनासक्ती. सदा अनासक्त राहा. आपल्या हृदयातील समस्त प्रेमावर फक्त एका जणाचाच अधिकार आहे आणि तो एकजण

कोण? तोच की ज्याच्यात कधीही बदल होत नाही, जो कधी परिणाम पावत नाही. आणि असा तो कोण आहे बरे? ईश्वर.

भगवान श्रीकृष्णांच्या उपदेशाचा हा केवळ एक पैलू आहे. त्यांचा दुसरा एक महान उपदेश असा आहे की, जे ह्या जगामध्ये वास करून कार्य करीत असतात, पण समस्त कर्मफले मात्र ईश्वराला समर्पित करतात, ते कधीच अशुभाने लिप्त होत नाहीत. पाण्यात राहणारे पद्मपत्र पाण्याने अवलिप्त होत नाही, तद्वतच जगात राहणाऱ्या ह्या व्यक्तीही पापाने लिप्त होत नाहीत.

श्रीकृष्णांचा आपल्याला उपदेश आहे की, "स्वत:च्या कर्तव्यकर्माची अवहेलना करू नका, ती टाळण्याचा यत्न करू नका. 'मनुष्या' प्रमाणे ती पार पाडण्यास सज्ज व्हा, त्यांचे फलाफल काय होईल याचा विचारही मनाला शिवू देऊ नका."

आपण बुद्धदेवांचा उपदेश, जगासमोर त्यांनी उद्घोषिलेला महान संदेश ऐकावयास सज्ज होऊ या. त्यांच्या वाणीलाही आपल्या हृदयात कायमचे स्थान आहे, आपल्या हृदयावर अधिकार गाजविल्याखेरीज ती कधीही राहत नाही. बुद्धांची शिकवण आहे, "स्वार्थपरतेचा, आणि जे काही तुम्हाला स्वार्थपर करून टाकते, त्या साऱ्याचा समूळ उच्छेद करुन टाका. स्त्री-पुत्र-कुटुंबादिकांचे लोढणे गळयात अडकवून घेऊन गृही वा संसारी होऊन बसू नका. संपूर्णपणे स्वार्थशून्य व्हा."

नाझरेथनिवासी ईशदूत येशूकडे दृष्टिक्षेप टाका. त्यांची शिकवण आहे.

– "तयार व्हा, कारण स्वर्गाचे राज्य अगदी निकट आहे. एका क्षणाचाही विलंब करू नका. काहीही उद्यावर ढकलू नका. त्या परम अवस्थेसाठी सदा तयार राहा, तिच्या लाभाचा क्षण केव्हा येऊन ठेपेल याचा काहीच नेम नाही. याच मुहूर्ती तो उपस्थित होऊ शकेल." म्हणून भगवान येशुख्रिस्तांच्या उपदेशालाही आमच्या हृदयात स्थान आहेच, आम्ही

त्यांचा उपदेश सादर शिरोधार्य करतो. त्या ईशदूताला, त्या मूर्तिमंत परमेश्वराला आम्ही वंदन करितो.

यानंतर आपल्या मनश्चक्षुसमोर उभे राहतात ते समतेचे उद्‌गाते– हजरत महंमद पैगंबर.

महंमद पैगंबर समतेचे आचार्य होते, मानवजातीतील बंधुभावाचे प्रचारक होते, मुसलमानांतील भ्रातृभावाच्या अग्निमंत्राचे दीक्षागुरु होते. महंमद पैगंबर आपल्या स्वतःच्या जीवनाने असा धडा घालून गेले आहेत की, त्यांच्या अनुयायांमध्ये–मुसलमानांमध्ये संपूर्ण समता आणि बंधुत्व निरंतर नांदावयास हवे; त्यांच्यात जातीचा, मताचा, वर्णाचा व लिंगाचा भेद कदापि शिरकू नये.

प्रत्येक अवताराचे, प्रत्येक द्रष्ट्याचे, प्रत्येक ईशदूताचे ह्या मर्त्यभूमीवर आगमन एक एक संदेश देण्यासाठी, जगाला एखादे विशिष्ट सत्य प्रदान करण्यासाठीच होत असते. प्रथम त्या विशिष्ट संदेशाचे, त्या विशिष्ट सत्याचे नीट आकलन करून, त्यानंतर जर आपण त्याचा प्रचार करणाऱ्या आचार्यांच्या जीवनाकडे दृष्टिक्षेप केला तर आपल्याला आढळून येईल की, त्या संदेशाच्या, त्या सत्याच्या प्रकाशात त्या त्या प्रचारकाचे समग्र जीवन सुस्पष्ट होत आहे. या महान आचार्यांचे स्वतःचे शब्दच त्यांच्या जीवनावरील सर्वोत्कृष्ट भाष्ये होत.

आतापर्यंत ज्या सर्व अवतारांच्या आणि महापुरुषांच्या हृदयंगम जीवनकथांचे आपण अनुशीलन केले त्यांच्याखेरीज आणखीही थोर अवतार– महापुरुष आपल्या ह्या वसुंधरेवर आविर्भूत होऊन तिला पुनीत करतील काय? होय, करतील, खचितच करतील. पण म्हणून त्यांच्या आगमनाची प्रतीक्षा करीत केवळ बसून मात्र राहू नका. त्यापेक्षा, उलट माझी तर अशी आकांक्षा आहे की, तुम्हा सर्वांनीच, समस्त प्राचीन संहितांची समष्टीच अशा या यथार्थ नवसंहितेचे द्रष्टे बनावे. प्राचीन काळचे विभिन्न अवतार–महापुरुष जे सर्व उपदेश देऊन गेले आहेत ते आत्मसात करा,

आणि त्यांना स्वत:च्या प्रत्यक्षानुभूतीची जोड देऊन अवतारी पुरुषांप्रमाणे इतरांसमोर सत्याची घोषणा करा. पूर्वीचे सर्वच आचार्य महान होते, त्यांच्यापैकी प्रत्येकजण आपल्यासाठी काही ना काही वारसा ठेऊन गेले आहेत. ते आपले ईश्वरच होत. त्यांना आपला प्रणाम असो, आपण त्यांचे दास आहोत. परंतु त्याबरोबरच आपण स्वत:लाही प्रणाम करूया, कारण ते जसे अवतार वा ईश्वराचे पुत्र आहेत. तसेच आपणही आहोत. ते पूर्णत्वाप्रत पोहोचले होते, सिद्ध झाले होते; आपणही आता, या जीवनातच सिद्धावस्था प्राप्त करून घेणार आहोत. येशुख्रिस्तांचे ते शब्द लक्षात ठेवा "स्वर्गाचे राज्य अगदी निकट आहे." बंधूंनो, या, ह्याच क्षणी आपण प्रत्येकजण अशी दृढ प्रतिज्ञा करूया की–"मी अवतारसदृश होईन, मी त्याच ज्योति:स्वरूप भगवंताचा संदेशवाहक बनेन, मी ईश्वराचा पुत्र, नव्हे स्वयं ईश्वरच होईन."

(संदर्भ : स्वामी विवेकानंद ग्रंथावली – ४)

***मराठी सिनिअर (इयत्ता ८, ९, १०)***

***विशेष सूचना :***

*१. प्रत्येकास फक्त ३ मिनिटे दिली जातील.*

*२. कृपया विषयास धरून बोलावे.*

*३. परिक्षकांद्वारा मूल्यांकन खालीलप्रमाणे:*

*(अ) मजकूर : ३० गुण (ब) स्पष्टता: १० गुण (क) प्रभाव : १० गुण*

# २. सतत पुढे चला

ईश्वराचे पुत्र तुम्ही, तुम्ही अमृताचे अधिकारी, पवित्र, पूर्ण. आपण दुर्बल आहोत असे तुम्ही कदापि म्हणता कामा नये! उठा, घीट बना; शक्तिमान बना. जे बल वा जे साहाय्य तुम्हास हवे आहे ते तुमच्या स्वत:च्या आतच आहे.

जोवर कोट्यावधी लोक उपाशी आणि अशिक्षित राहतील तोवर त्यांच्याच पैशाने शिक्षण घेऊन त्यांच्याकडे जे ढुंकूनही पाहत नाहीत त्यांना मी कृतघ्न आणि द्रोही समजतो. क्षुधार्त रानटी माणसांपेक्षा ज्यांची अवस्था काही अधिक चांगली नाही अशा वीस कोटी गरीब देशबांधवांना पिळून काढून, त्यांच्या पैशावर चैन करून जे थाटामाटाने हिंडतात पण त्यांच्यासाठी काही करीत नाहीत त्यांना मी घृणास्पद समजतो.

**आत्मवत् सर्वभूतेषू** - 'स्वत:प्रमाणे सर्व प्राणिमात्रांकडे पाहावे' – ही शिकवण केवळ ग्रंथातच अडकून पडणार की काय? एखाद्या भुकेलेल्या माणसाला भाकरीचा तुकडा देऊन त्याची भूक ज्यांना शमविता येत नाही ते लोकांना मुक्ती कशी देणार? जे नुसत्या दुसऱ्यांच्या उच्छ्वासाने अपवित्र होतात ते इतरांना पवित्र कसे बनविणार? 'शिवू नका' वाद हा एक मानसिक रोग आहे.

उठा आणि आपला पुरुषार्थ दाखवा... एखाद्या मालकाच्या भावनेने नव्हे, अंधश्रद्धेने किंवा पौर्वात्य आणि पाश्चिमात्य वैदूंच्या दांभिकतेने भरलेल्या सडक्या अहंकाराने नव्हे, तर सेवकाच्या भावनेने हे कार्य करण्यास सिद्ध व्हा.

प्रत्येक वस्तूचा पहिला वाटा गरिबांना मिळाला पाहिजे. आपला हक्क केवळ उरलेल्यावर आहे. प्रथम आवश्यक आहे विराटाची पूजा. आपल्या भोवताली असणाऱ्या सर्व जीवांची पूजा. त्या विराटाची पूजा करा. 'पूजा' हा शब्दच या ठिकाणी योग्य आहे. दुसरा कोणताही शब्द चालणार नाही. माणसे व पशू हे सर्व आपले देव आहेत, आणि ज्यांची आपण सर्वप्रथम पूजा करावी असे देव म्हणजे आपले देशबांधव होत. आपला समाज हेच एकमेव जागृत दैवत आहे. त्याचे हात, पाय सर्वत्र आहेत, त्याचे कान सर्व ठिकाणी आहेत. त्याने सर्वकाही व्यापले आहे. बाकी सर्व देव निद्रिस्त आहेत. व्यर्थ अशा देवतांच्या मागे आपण धावत आहोत, पण भोवताली पसरलेल्या विराट अशा साक्षात परमेश्वराला आपण पूजित नाही.

प्रत्येक स्त्री-पुरुषाकडे, सर्वांकडे, ते सारेजण ईश्वराची रूपे आहेत या दृष्टीने पाहा. इतकी तपश्चर्या करून मला हेच सत्य कळले की, प्रत्येक जीवाच्या ठिकाणी भगवंताचा वास आहे, याखेरीज ईश्वरबीश्वर आणखी काहीही नाही. जीवांची सेवा हीच ईश्वराची सेवा. ईश्वराचे व्यक्त रूप अशा आपल्या मानवबांधवांची जर तुम्ही उपासना करू शकत नसाल तर मग अव्यक्त ईश्वराची तुम्ही काय उपासना करू शकाल? ईश्वराच्या पूजेसाठी एखादे मंदिर निर्माण करावयाचे असेल तर ते खुशाल करा. त्याला काही हरकत नाही, ते चांगलेच आहे. पण लक्षात असू द्या, की त्यापेक्षा अधिक चांगले, त्यापेक्षा कितीतरी श्रेष्ठ मंदिर आधीचेच अस्तित्वात आहे. ते म्हणजे मानवशरीर.

देह-मन-वाणी ही 'जगद्धिताय' अर्पण केली पाहिजेत. 'मातृदेवो भव, पितृदेवो भव' असे आजवर तुम्ही वाचले, पण मी सांगतो 'दरिद्रदेवो भव, मूर्खदेवो भव' -दरिद्री, मूर्ख, अज्ञ, दुःखी, हेच तुमचे देव होवोत. यांची सेवा म्हणजेच परम धर्म, ही गोष्ट जाणून असा.

मला निश्चित ठाऊक आहे की भारतमातेला तिच्या सर्वश्रेष्ठ व सर्वोत्कृष्ट संतानांच्या बलिदानाची आवश्यकता आहे. या पृथ्वीवरील सर्वात पराक्रमी आणि सर्वश्रेष्ठ लोकांना 'बहुजनहिताय बहुजनसुखाय' आत्मबलिदान करावेच लागेल. अंत:करणात अनंत प्रेम आणि दया असलेले शेकडो बुद्ध आज हवे आहेत.

माणसे हवी आहेत, माणसे हवी आहेत. इतर सर्वकाही आपोआप जुळून येईल, परंतु सशक्त, उत्साही, श्रद्धावान व निष्कपट अशी तरुण माणसे हवी आहेत. असे शंभर तरुण मिळाले तरी सर्व जगात क्रांती घडविता येईल. प्रथम त्यांच्या जीवनाला वळण लावावे लागेल, काही आकार द्यावा लागेल, मगच त्यांच्याकडून खऱ्याखऱ्या कार्याची अपेक्षा करणे उचित ठरेल.

हिंदुस्थानातील सर्वसामान्य जनतेचा उद्धार करणे हेच आपले कर्तव्य होय असे मानणाऱ्या व त्यासाठी आपले मन:प्राण अर्पण करण्यास तयार असलेल्या तरुण लोकात काम करायला सुरुवात करा. त्यांच्यात जागृती निर्माण करा, त्यांना संघटित करा आणि त्यांच्या ठायी त्यागाची प्रेरणा उत्पन्न करा. हे सारे कार्य भारतीय तरुणांवरच पूर्णपणे अवलंबून आहे.

मी या युवकांचे संघटन करण्यासाठीच जन्म घेतला आहे. एवढेच नव्हे, तर भारताच्या प्रत्येक नगरातील आणखी शेकडो तरुण मला येऊन मिळण्यास तयार आहेत, माझ्याबरोबर कार्य करण्यास तत्पर आहेत. ते एखाद्या विशाल दुर्निवार लाटेप्रमाणे भारताला व्यापून टाकतील आणि जे अत्यंत हीन-दीन आहेत, जे अत्यंत दलित आहेत. त्यांच्या दारीदारी सुख-सांत्वन, नीती, धर्म व शिक्षण ही घेऊन जातील. हीच माझी आकांक्षा आहे. हेच माझे व्रत आहे. एक तर हे व्रत मी पार पाडीन, नाही तर मृत्यू पत्करीन!

हे महान आत्म्यांनो, उठा, जागे व्हा! सगळे जग दु:खाने होरपळत आहे. अशावेळी तुम्हाला झोप कशी येते? आपण हाका मारून निद्रिस्त देवतांना जागृत करु या. अंत:स्थ ईश्वराचे प्रत्युत्तर येईपर्यंत आपण हाका मारु या. जीवनात दुसरे काय आहे?

मोहरूपी मगराच्या जबड्यात लोक कसे सापडले आहेत ते पहा! अहो त्यांच्या हृदयभेदक किंकाळया ऐका! पुढे व्हा, पुढे व्हा. बंधनात अडकलेल्या लोकांना मुक्त करण्यासाठी, दु:खी लोकांचा दु:खभार हलका करण्यासाठी, अज्ञानी लोकांच्या हृदयातील घोर अंध:कार दूर करून त्यांना ज्ञानाचा प्रकाश देण्यासाठी हे वीरात्म्यांनो, पुढे व्हा. हृदयशून्य बुद्धिवादी लेखकांची आणि वर्तमानपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या त्यांच्या सहानुभूतिशून्य लेखनांची पर्वा करू नका. बंधूंनो, आपण निर्धन आहोत, आपण नगण्य आहोत, पण आपल्यासारख्या गरिबांकडूनच ईश्वराने आजवर आपली कार्ये करवून घेतली आहेत. या जगातील सर्व महान व प्रचंड कार्ये गरीबांनीच केलेली आहेत. तथाकथित श्रीमंतांवर भरवसा ठेवून चालू नका. ते एका अर्थाने मेलेलेच आहेत असे म्हणावयास हरकत नाही. आता भरवसा तुमचाचं आहे जे गरीब आहेत, ज्यांना समाजात स्थान नाही, पण ज्यांच्या ठायी विश्वास आहे अशा तुमचाचं भरवसा आहे.

पुढे चला, सतत पुढे चला! अगदी अखेरपर्यंत गरीब व दलित यांच्याविषयी सहानुभूती बाळगा - हाच आपला मूलमंत्र असू द्या. ईश्वरावर विश्वास असू द्या. कोणत्याही कूटनीतीचे काही प्रयोजन नाही. कूटनीतीने, कपटाने, चलाखीने काहीही साधत नसते. दु:खितांसाठी तुमचे हृदय कळवळू द्या आणि साहाय्यासाठी भगवंताची प्रार्थना करा, तुम्हाला साहाय्य मिळेलच.... मी तुमच्यासाठी गरीब, अज्ञानी आणि दलित यांच्याविषयी सहानुभूतीचा आणि त्यांच्या उन्नतीसाठी प्राणपणास लावून प्रयत्न करण्याचा वारसा ठेवून जात आहे.... हे जे तीस कोटी भारतवासी दिवसेंदिवस खाली खाली जात आहेत. त्यांना वर आणण्यासाठी, त्यांचा उद्धार करण्यासाठी आपले सारे जीवन अर्पण करण्याची तुम्ही प्रतिज्ञा करा. तुम्ही खरोखरच जर माझे संतान असाल तर तुम्हाला कशाचीही भीती बाळगायला नको. कशानेही तुमच्या प्रगतीत बाधा यायला नको. तुम्ही सिंहासारखे व्हाल. आपण साऱ्या भारताला, समस्त जगताला जागृत केले पाहिजे.

गावोगाव हिंडा आणि मानवाचे व एकंदर जगाचे कल्याण करा.

दुसऱ्यांना मोक्ष मिळावा यासाठी स्वतः नरकात जाण्याची तयारी ठेवा. अरे, मृत्यू जर अटळच असेल तर क्षुद्र किड्याप्रमाणे मरण्यापेक्षा वीरोचित मरण कवटाळणे अधिक बरे नाही का?... जराजीर्ण अवस्थेत खितपत पडून थोडे थोडे मरण्यापेक्षा, अल्पकालातच का होईना, पण परकल्याणार्थ झटून चटकन मरून जाणे बरे नाही का?

तुम्ही फक्त कामाला सुरवात तर करा आधी. मग पहाल इतकी शक्ती तुमच्यात येईल की तुम्हाला ती सावरता सावरली जाणार नाही. दुसऱ्यांसाठी एवढेसे जरी काम केले तरी ती आतली शक्ती जागृत होते, दुसऱ्यांबद्दल थोडा जरी विचार केला तरी हृदयात सिंहबळाचा संचार होतो. तुमच्याबद्दल माझे एवढे अलोट प्रेम आहे, पण तरीही मला वाटते की दुसऱ्यांसाठी तुम्ही आपले प्राण वेचावेत. ते तुमचे मरण पाहून मला आनंदच होईल!

पैशाचा म्हणा, कीर्तीचा म्हणा की आणखी कशाचा म्हणा, कोणताच हेतू हृदयात न बाळगता जो कर्म करतो तोच खरोखर सर्वांपेक्षा उत्तम रीतीने कर्म करीत असतो. मनुष्य असे करू शकल्यास बुद्ध बनून जाईल आणि मग त्याच्यामधून कर्मांची अशी शक्ती प्रकट होईल की तिच्या योगाने या दुनियेची अवस्था पूर्णपणे बदलून जाऊ शकेल.

प्रेमाचा विजय होईलच. मानवजातीवर तुमचे प्रेम आहे का? ईश्वराच्या शोधासाठी तुम्ही कुठे जाणार! गरीब, दुःखी, दुर्बल हेच तुमचे ईश्वर नाहीत का? आधी त्यांची उपासना का करीत नाही? गंगेच्या काठी राहून तुम्ही विहीर का खणता? 'प्रेम सर्वशक्तिसंपन्न आहे' या सत्यावर विश्वास असू द्या.

ईश्वराला मदत करण्याची नव्हे, तर ईश्वरासाठी काम करण्याची आपल्याला संधी मिळाली आहे याबद्दल आपण धन्यता मानायला हवी. 'मदत' हा शब्द तुम्ही आपल्या मनातून अगदी काढून टाका. तुम्ही ईश्वराला मदत करू शकत नाही. 'मी ईश्वराला मदत करतो' असे म्हणणे ही ईश्वरनिंदा आहे. केवळ 'पूजा' या भावनेने ही सेवा करा. मला गरिबांमधे परमेश्वर पाहता आला पाहिजे, आणि माझ्या मोक्षप्राप्तीकरिता मी त्यांच्याकडे जाऊन

त्यांची पूजा केली पाहिजे. गरीब आणि दु:खी लोक हे आपल्या मुक्तीकरिता आहेत. रुग्ण, वेडा, कुष्ठपीडित आणि पतित यांच्या रूपाने आपल्या समोर आलेल्या ईश्वराची आपल्याला सेवा करता यावी यासाठीच हे लोक आहेत!

स्वत:ला विसरून जा. आधी हा धडा गिरवा, बाकीचे नंतर. मग तुम्ही आस्तिक असा की नास्तिक असा. समाजासाठी जेव्हा स्वत:ची समस्त सुखेच्छा बळी देऊ शकाल तेव्हा तर तुम्ही बुद्ध होऊन जाल, तुम्ही मुक्त होऊन जाल.

'तमसो मा ज्योतिर्गमय' हीच आपली प्रार्थना असो. याही अंधारातून आशेचा किरण दिसेलच दिसेल. यातूनच आपल्याला मार्गदर्शन करण्यासाठी त्याचा हात पुढे येईल.... दारिद्र्य, पुरोहितबाजी आणि अत्याचार यांनी पीडित झालेल्या कोट्यावधी भारतीय पददलितांसाठी आपल्यापैकी प्रत्येकाने रात्रंदिवस प्रार्थना करावयास हवी. संपन्न वा उच्चवर्गीयांपेक्षा यांनाच धर्म शिकवावा अशी माझी इच्छा आहे. मी दार्शनिक नाही, तत्त्वज्ञ नाही व संतही नाही. मी गरीब आहे आणि गरिबांबद्दल मला प्रेम वाटते. दारिद्र्य आणि अज्ञान यांच्या पंकात रूतून बसलेल्या भारतातील वीस कोटी स्त्री-पुरुषांबद्दल कुणाचे मन कळवळते?... ज्याचे हृदय गरिबांसाठी द्रवते त्यालाच मी 'महात्मा' म्हणेन.... त्यांच्या वेदना पाहून कुणाच्या तरी अंत:करणाला पीळ पडतो का? ... हे लोक म्हणजेच तुमचा ईश्वर, त्यांच्याच कल्याणाची चिंता वाहा, त्यांच्यासाठीच कर्मे करा. त्यांचीच कल्याणकामना मनात बाळगून त्यांच्यासाठी सतत प्रार्थना करा. प्रभू तुम्हास मार्ग दाखवितील.

महान कार्य करावयाचे असेल तर त्यासाठी तीन गोष्टी आवश्यक असतात. प्रथमत: हृदयाची तळमळ हवी. तुमच्या हृदयात तळमळ आहे काय? देवतांचे व ऋषींचे लाखो वंशज आज पशुतुल्य बनले आहेत. हे बघून तुमच्या हृदयाला पीळ पडतो काय? कोट्यावधी लोक आज भुकेने तडफडत आहेत, नव्हे शेकडो वर्षांपासून ते तसे तडफडत आहेत. हे पाहून तुमच्या हृदयाला घरे पडतात काय? त्यामुळे तुम्ही अस्वस्थ झाला आहात काय? त्यामुळे तुमची झोप उडाली आहे काय? ही तीव्र भावना

तुमच्या नसानसांतून शिरली आहे काय? तुमच्या रक्तात ती भिनून तुमच्या हृदयस्पंदनांशी ती एकरूप झाली आहे काय? तिने तुम्हाला अक्षरशः वेड लावले आहे काय? देशाच्या दुर्दशेच्या या चिंतेने तुम्हाला पूर्णपणे ग्रासून टाकले आहे काय? या चिंतेने ग्रासल्यामुळे तुमचे नावलौकिक, तुमची पत्नी, तुमची मुले, तुमची संपत्ती, इतकेच नव्हे तर तुमचे स्वतःचे शरीर, या साऱ्यांचा तुम्हाला विसर पडला आहे काय? तुमची अशी अवस्था झाली आहे काय? देशभक्त होण्याची ही पहिली पायरी आहे; अगदी पहिलीच पायरी आहे. आपल्या देशबांधवांची दुर्दशा थांबविण्याकरिता तुम्ही काही प्रत्यक्ष मार्ग शोधून काढला आहे काय? लोकांना शिव्याशाप देण्याऐवजी तुम्ही त्यांना खरोखर काही मदत करू शकता काय? त्यांना या जीवन्मृत अवस्थेतून बाहेर काढण्याकरिता आणि त्यांच्या या दुःखात त्यांचे सांत्वन करण्याकरिता तुमच्याजवळ गोड शब्द आहेत काय? पण केवळ एवढेच पुरेसे नाही. पर्वतप्राय विघ्नांना तोंड देता येईल असा दृढनिश्चय तुमच्या ठायी आहे काय? सर्व जग हाती खड्ग घेऊन तुमच्या विरुद्ध उभे झाले तरीही तुम्हाला जे सत्य वाटते ते करण्याचे धैर्य तुमच्यात आहे काय?... अशा परिस्थितीत देखील तुम्ही आपल्या ध्येयाचा पाठपुरावा करीत धीराने वाटचाल करीत राहाल काय? ... तुमच्या ठायी अशी चिकाटी आहे काय? तुमच्या ठायी या तीन गोष्टी असतील तर तुमच्यापैकी प्रत्येकजण अचाट कामे करील.

जेणेकरून आपले संकल्प व आपल्या योजना कृतीत उतरतील यासाठी जीव तोडून प्रयत्न करा, प्राणपणाने प्रयत्न करा. वत्सांनो, हे वीरांनो, थोर हृदयाच्या तरुणांनो, उठा आणि कामाला लागा. नावलौकिकासाठी अथवा अन्य एखाद्या क्षुद्र वस्तूसाठी मागे वळून बघू नका. स्वार्थाचे संपूर्णपणे निर्मूलन करून कार्याला लागा.

पुढे चला! आपल्याला अनंत शक्ती, असीम उत्साह, अपार साहस आणि अनंत धीर पाहिजे, तरच आपल्याकडून महान कार्ये साध्य होतील.

वत्सा, मला असे लोक हवेत की ज्यांचे स्नायू लोखंडी असून ज्यांच्या

नसा पोलादी आहेत. आणि ज्यांचे मन वज्र, ज्या द्रव्याचे बनलेले असते त्याचे बनविले आहे. सामर्थ्य हवे, पौरुष हवे, क्षात्रवीर्य आणि ब्राह्मतेज यांचा मिलाफ हवा.

आज्ञाधारकता अंगी बाणवा, पण स्वत:ची श्रद्धा मात्र गमावू नका. गुरुजनांच्या आज्ञा पाळल्याखेरीज शक्तीचे केंद्रीकरण शक्य नाही. वैयक्तिक शक्तींचे असे केंद्रीकरण झाल्याखेरीज कोणतेही महत्कार्य होणे शक्य नाही.

जे जे म्हणून असत्य असेल ते कटाक्षाने टाळा: सत्याची कास कोणत्याही परिस्थितीत सोडू नका. अशाने उशिरा का होईना, पण यश आपले आहे हे निश्चित समजा. काम करा. फक्त एकट्या आपल्यावरच साऱ्या कार्याची मदार आहे अशा भावनेने काम करा.

नीतिपरायण व साहसी व्हा. हृदय अगदी शुद्ध असू द्या. पूर्णपणे नीतिपरायण व शूर व्हा. प्राणांची देखील पर्वा करू नका. धार्मिक मतमतान्तराच्या बाबतीत उगीच डोके शिणवू नका. जे भित्रे आहेत तेच पाप करत असतात. वीर कधीही पाप करीत नाहीत. पापी विचार देखील ते मनात येऊ देत नाहीत.

पुढील दोन गोष्टींविषयी सावध राहा अधिकारलालसा आणि मत्सर. आत्मविश्वास अंगी बाणविण्याचा सर्वदा प्रयत्न करा.

प्रथम 'माणसे' निर्माण करा. आपल्याला 'माणसे' हवी आहेत. आणि श्रद्धा असल्याशिवाय 'माणसे' कशी तयार होतील?

उठा, जागे व्हा. स्वत: जागे व्हा व बाकी साऱ्यांना जागे करा: नरजन्माचे सार्थक करा **'उत्तिष्ठत, जाग्रत, प्राप्य वरान्निबोधत.'**

*मराठी सिनिअर (इयत्ता ८, ९, १०)*

***विशेष सूचना :***

*१. प्रत्येकास फक्त ३ मिनिटे दिली जातील.*

*२. कृपया विषयास धरून बोलावे.*

*३. परिक्षकांद्वारा मूल्यांकन खालीलप्रमाणे:*

*(अ) मजकूर : ३० गुण (ब) स्पष्टता: १० गुण (क) प्रभाव : १० गुण*

# ३. कर्म आणि त्याचे रहस्य

माझ्या आयुष्यात जी एक फार महत्वाची गोष्ट मी शिकलो आहे ती ही की कर्माच्या बाबतीत साध्याइतकेच साधनांकडेही लक्ष द्यायला पाहिजे.

ज्यांच्यापासून मी हा धडा घेतला ते फार थोर पुरुष होते आणि त्यांचे स्वत:चे जीवन हे ह्या महान तत्वाचे प्रत्यक्ष उदाहरण होते. त्या एकाच तत्वापासून मी नेहमी अनेक महत्वाचे धडे शिकत आलो आहे. आणि मला असे वाटते की साध्याइतकेच साधनांकडे लक्ष देणे ह्या एकाच तत्वात सर्व कर्माच्या यशाचे रहस्य सामावलेले आहे.

आपल्या जीवनामधील फार मोठी चूक जर कोणती असेल तर ही की आपण ध्येयाकडे इतके आकर्षिले जातो, ते आपल्याला इतके मोहक वाटते, आपल्या मनावर त्याचा इतका प्रभाव पडतो की ते प्राप्त करून घेण्याच्या साधनांच्या तपशीलाकडे आपले दुर्लक्ष होते.

परंतु जेव्हा जेव्हा आपल्याला अपयश येते. तेव्हा तेव्हा अगदी बारकाईने त्याचे पृथक्करण केल्यास शेकडा नव्याण्णव वेळा आपल्याला असे आढळून येते की आपण साधनांकडे पुरेसे लक्ष दिले नाही, हेच आपल्या अपयशाचे कारण आहे. साधने परिपूर्ण आणि बलवत्तर करण्यासाठी

त्यांच्याकडे योग्य लक्ष देणे हे आपल्यापक्षी आवश्यक आहे. साधने योग्य व परिपूर्ण असतील तर ध्येय प्राप्त झाल्याशिवाय राहणार नाही. आपण ही गोष्ट विसरून जातो की कारणापासूनच कार्याची उत्पत्ती होते, कार्य आपोआप निर्माण होत नाही, आणि कारणे योग्य, अचूक व बलवान असल्याखेरीज कार्याची निर्मिती होणार नाही. एकदा ध्येय ठरविले व त्याची साधने निश्चित केली की मग आपण ध्येयाचा विचार करणे प्राय: सोडून दिले तरी हरकत नाही, कारण आपल्याला खात्री असते की साधने परिपूर्ण झाल्यावर ध्येयप्राप्ती झाल्यावाचून राहणार नाही. कारण जर उपस्थित असेल तर त्याचा परिणाम म्हणजे कार्य दिसून येण्यासाठी विशेष अडचण भासणार नाही. मग कार्याची उत्पत्ती होईलच. आपण जर कारणाच्या बाबतीत काळजी घेतली तर कार्य हे आपोआप निर्माण होईलच. ध्येयसिद्धी हे एक कार्य आहे आणि साधन हे कारण आहे. म्हणून साधनाकडे लक्ष देणे हे जीवनसाफल्याचे लक्षण आहे.

आपण जर आपल्या जीवनाचे परीक्षण केले तर आपल्याला असे आढळून येईल की दु:खाचे सर्वात मोठे कारण पुढीलप्रमाणे आहे. आपण काहीतरी कार्य करायला सुरुवात करतो, त्याला आपण सर्वस्वी वाहून घेतो, आपल्याला त्यात अपयश आले तरी आपण त्याचा त्याग करू शकत नाही. आपल्याला माहीत असते की त्यापासून आपल्याला कष्ट होत आहेत आणि जर आपण यापुढेही त्याला चिकटून राहिलो तर आपल्यावर दु:खाचा डोंगर कोसळेल. ही जाणीव असूनही आपण त्याच्या बंधनातून सुटू शकत नाही.

दु:खाचे प्रमुख कारण हे आहे की आपण आसक्त आहोत, आपण बंधनात सापडलेले आहोत. यासाठी गीता सांगते, "सतत कर्म करा; कर्म करा पण आसक्त होऊ नका, बंधनात पडू नका." कोणत्याही वस्तूवरून मन काढून घेण्याची शक्ती स्वत:मध्ये साठवून ठेवा. एखादी वस्तू तुम्हाला कितीही प्रिय असो, तिच्यासाठी तुमचे प्राण कितीही व्याकूळ होत असोत, तिचा त्याग करण्याचा प्रसंग आला तर तुम्हाला होणाऱ्या

यातना कितीही भयंकर असोत, तरी वाटेल तेव्हा तिचा त्याग करण्याचे सामर्थ्य तुमच्या अंगी असू द्या. दुर्बलांना या जगात स्थान नाही आणि परलोकातही नाही. दुर्बलतेमुळे मनुष्य गुलाम बनतो. सर्व शारीरिक व मानसिक दु:खाचे कारण ही दुर्बलताच होय. दुर्बलता म्हणजे मृत्यू होय. रोगाचे असंख्य जंतू आपल्याभोवती पसरलेले आहेत परंतु जर आपण दुर्बल नसलो, जर आपले शरीर आधीपासून अस्वस्थ नसले तर ते आपल्याला काही करू शकत नाहीत. दु:खाचे असंख्य जंतू आपल्याभोवती हवेत तरंगत असले तरी काही हरकत नाही. आपले मन जर कमकुवत नसेल तर आपल्याला स्पर्श करण्याचे धैर्य त्यांना होणार नाही, आपल्यावर प्रभाव गाजविण्याचे सामर्थ्य त्यांच्या ठिकाणी राहणार नाही. 'सामर्थ्य हेच जीवन आणि दुर्बलता म्हणजे मृत्यू.' हे एक महान सत्य आहे. बल हे सुख आहे, चिरंतन व शाश्वत जीवन आहे. दुर्बलता म्हणजे सतत दु:ख आणि कष्ट होय, दुर्बलता म्हणजे मृत्यू होय.

आपण जे जे काही करतो त्याचा मोबदला आपल्याला हवा असतो. आपण सारे व्यापारी वृत्तीचे आहोत. आपण जीवनाचा व्यापार करतो, सद्गुणांचा व्यापार करतो, धर्माचाही व्यापार करतो. अरेरे! आपण प्रेमाचाही व्यापार करतो.

तुम्हाला जर व्यापार करावयाचा असेल, देवघेव करावयाची असेल, किंवा खरेदी-विक्री करावयाची असेल तर तुम्हाला खरेदी-विक्रीचे व्यापारी नियम पाळावे लागतील. कधी चांगला काळ येईल तर कधी वाईट काळ येईल. कधी भाव कडाडतील तर कधी ते घसरतील. केव्हातरी धक्का बसेल हे गृहीत धरून तुम्हाला चालावे लागेल. व्यापार हे आरशात स्वत:चे रूप पाहण्यासारखे आहे. तुमच्या चेहऱ्याचे प्रतिबिंब आरशात पडते. तुम्ही वाकुल्या दाखविल्यात तर आरसाही तसेच करील. तुम्ही हसलात तर आरसाही हसतो. खरेदी-विक्रीचे वा देवघेवीचे स्वरूप असेच असते.

आपण बंधनात सापडतो. पण का? आपण दुसऱ्याला काही देतो त्यामुळे नव्हे, तर आपण कशाची तरी अपेक्षा करतो त्यामुळे. आपण जे प्रेम करतो त्याच्या बदल्यात आपल्याला दु:ख मिळते. परंतु आपण प्रेम करतो म्हणून आपल्याला दु:ख मिळत नाही. तर प्रेमाच्या बदल्यात प्रेम मिळावे अशी अपेक्षा असते म्हणून आपल्याला दु:ख मिळते. ज्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची कामना नाही, त्या ठिकाणी दु:ख नाही. कामना वा इच्छा हीच दु:खाची जननी आहे. आपल्या कामना यश–अपयशाच्या नियमांनी बांधलेल्या असतात. कामनांबरोबर दु:खे आल्याशिवाय राहत नाहीत.

म्हणून खऱ्या यशाचे वा सुखाचे महान रहस्य हे आहे की जो मनुष्य परतफेडीची अपेक्षा करीत नाही, जो पूर्णपणे नि:स्वार्थ आहे तोच सर्वात यशस्वी मनुष्य होय.

कोणत्याही गोष्टीची याचना करू नका, परतफेडीची अपेक्षा ठेवू नका. तुम्हाला जे द्यायचे असेल ते देऊन टाका. तुम्हाला ते परत लाभल्याशिवाय राहणार नाही. परंतु त्याचा आता विचार करू नका. ते सहस्रपटीने तुम्हाला मिळाल्याशिवाय राहणार नाही, पण त्यावर लक्ष ठेवू नका. देण्याची शक्ती संपादन करा; जे काही द्यायचे असेल ते द्या आणि मग त्याचा विचार करू नका. सर्व जीवनभर तुम्हाला देत राहावयाचे आहे हे ध्यानात ठेवा. प्रकृती तुम्हाला द्यावयास भाग पाडील. म्हणून स्वखुशीने द्या. कधी ना कधी तुम्हाला त्याग करावाच लागेल. काहीतरी गोळा करावे म्हणून तुम्ही या जगात येता, मुठी भरभरून घेण्याचा प्रयत्न करता परंतु प्रकृती तुमचा गळा दाबते आणि तुम्हाला मूठ उघडायला लावते. तुमची इच्छा असो वा नसो, तुम्हाला द्यावेच लागेल. ज्याक्षणी 'मी देणार नाही' असे उद्गार तुम्ही काढता त्याक्षणी तुमच्यावर आघात होतो. आणि तुम्हाला इजा होते. असा कोणीही नाही की ज्याला सरतेशेवटी सर्वस्वाचा त्याग करावा लागणार नाही. जो या

सिद्धांताविरूद्ध वागण्याची जितकी अधिक धडपड करतो तितके त्याला अधिक दु:ख होते. आपण देण्याचे साहस करीत नाही, प्रकृतीच्या या उदात्त मागणीचा स्वीकार करण्यास आपण स्वखुशीने तयार होत नाही हेच आपल्या दु:खाचे कारण होय. महासागराचे पाणी सूर्य शोषून घेतो, पण पावसाच्या रूपाने तो ते परत करतो. तुम्ही देवघेवीचे केवळ एक साधन आहात, केवळ देण्यासाठीच तुम्ही घेत असता. म्हणून बदल्यात काही मागू नका परंतु जितके तुम्ही अधिक द्याल, तितके तुम्हाला अधिक परत मिळेल. या खोलीतील हवा तुम्ही जितक्या लवकर बाहेर घालवाल तितक्या लवकर बाहेरची हवा आत येऊन खोली भरून टाकील. आणि जर तुम्ही सारे दरवाजे व खिडक्या बंद ठेवाल तर आतील हवा आत राहील. पण बाहेरील हवा कधीच आत येऊ शकणार नाही. आणि ती आतील हवा कोंदट, अशुद्ध व विषारी बनून जाईल. नदी ही महासागराला मिळून सतत रिकामी होत असते, आणि ती पुन: सतत भरली जात असते. महासागराला मिळणारे तिचे मुख बंद करू नका. ज्या क्षणी तुम्ही ते कराल त्या क्षणीच तुम्ही मरणाच्या तावडीत सापडाल.

आपण स्वत: जर दुबळे नसलो तर कोणत्याही गोष्टीचा आपल्यावर परिणाम होणार नाही ही गोष्ट आपण ध्यानात ठेवली पाहिले. आताच मी आपल्याला सांगितले की आपले शरीर रोगाला अनुकूल नसेल तर आपल्याला कोणताच रोग होणार नाही. रोग हा केवळ जंतूंवर अवलंबून नसतो, तर आपल्या शरीराच्या अवस्थेवर तो अवलंबून असतो. ज्या गोष्टीला आपण पात्र असतो तीच आपल्याला मिळत असते. अभिमान टाकून ही गोष्ट आपण समजून घेतली पाहिजे की दु:ख काही अकारण भोगावे लागत नाही. कोणावरही निष्कारण आघात झालेले नसतात. स्वत:च्या हातांनी मार्ग तयार केल्याशिवाय कोणतेही अनिष्ट आपल्यावर कोसळत नाही. आपण हे जाणून घेतले पाहिजे. आपण आपल्या जीवनाचे पृथक्करण केले तर आपल्याला असे आढळून येईल की आपल्यावर जो जो आघात झाला त्याचे कारण हे की आपण स्वत:च त्याची पूर्वतयारी

केली होती. अर्धी कामगिरी आपण स्वत: करतो व उरलेली अर्धी बाह्य जग करते, आणि अशा रीतीने आपल्यावर आघात होतो. हे जर आपल्याला कळले तर आपले मन शांत होईल. त्याचप्रमाणे या विश्लेषणापासून आपल्याला आशेचा एक संदेश मिळेल. तो असा : बाह्य जगतावर माझा ताबा नाही. परंतु जे माझ्या आत आहे, जे माझ्या अधिक निकट आहे, जे माझे अंतर्जगत आहे त्यावर माझा ताबा आहे. अपयशासाठी या दोहोनी एकत्र येणे जर जरूर असेल, माझ्यावर आघात करण्यासाठी या दोघांची युती जर आवश्यक असेल, तर जी गोष्ट माझ्या ताब्यात आहे ती मी नियंत्रणात ठेवीन आणि तसे झाले तर आघात कसा होईल? मी माझे स्वत:चे जर खरोखर नियमन केले तर माझ्यावर कोणत्याही प्रकारचा आघात कधीही होणार नाही.

अगदी लहानपणापासून सर्व आयुष्यभर बाहेरील कोणत्या ना कोणत्या वस्तूवर सारा दोष टाकण्याचा आपण प्रयत्न करीत असतो. आपण स्वत: सुधारण्याऐवजी इतरांना सुधारण्याचा जणुकाय विडाच उचलला आहे व त्यासाठी आपण नेहमीच तयार असतो. आपल्याला दु:ख झाले की आपल्या मुखातून उद्‌गार निघतात, ‘हे जग सैतानाचे आहे.’ आपण दुसऱ्यांना शिव्याशाप देतो व म्हणतो, ‘काय हे मोहांध मूर्ख लोक आहेत!’ पण आपण जर खरोखर फार चांगले असलो तर अशा जगात राहण्याचा प्रसंग आपल्यावर का यावा? जर ही दुनिया सैतानांची असेल, तर आपणही सैतानच असलो पाहिजे. नाही तर आपण या ठिकाणी का राहिलो असतो? आपण म्हणतो, “अरेरे! जगातील लोक किती स्वार्थी आहेत!” हे सत्य असेल. पण आपण चांगले आहोत तर त्यांच्या सहवासात आपण का राहतो? याचा जरा विचार करा.

आपल्या पात्रतेप्रमाणे आपल्याला सर्वकाही मिळत असते. ‘जग वाईट व आम्ही मात्र चांगले’ असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा ते असत्य असते. असे कधीही होऊ शकत नाही. हे भयंकर असत्य आपण स्वत:ला सांगत असतो.

आपण हा पहिला धडा घेतला पाहिजे. ‘मी बाहेरील कोणत्याही गोष्टीला केव्हाही शिव्या देणार नाही, दुसऱ्या कोणाही व्यक्तीला मी दोष देणार नाही.’ असा निश्चय करा. धीट व्हा आणि सारा दोष स्वतःवर घ्या. अशी वागणूक हीच खरी वागणूक असे तुम्हाला दिसून येईल. म्हणून आधी स्वतःमधे सुधारणा करा.

आपण प्रथम स्वतःकडे लक्ष दिले पाहिजे. एवढे आपण करू शकतो. दुसऱ्याकडे लक्ष देणे काही काळ आपण सोडून दिले पाहिजे. साधने परिपूर्ण करण्याचा आपण प्रयत्न करूया, मग आपल्याला ध्येय आपोआपच प्राप्त होईल. आपले स्वतःचे जीवन जर शुद्ध व चांगले असेल तरच जग चांगले व शुद्ध होईल. तो परिणाम आहे, आपण त्याचे कारण आहोत. म्हणून आपण स्वतःला शुद्ध करू या. आपण स्वतः पूर्ण बनू या.